# प्रेसनोट दि. ०२/०८/२०१८

## अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेची कामगिरी

## "रात्र गस्ती दरम्यान छापा टाकुन ३० किलो गांजा जप्त"

बाहेरील जिल्हयातील काही इसम, गांजा आणुन, त्याची पुणे शहरात विक्री केली जात असल्याचे निदर्शनास आले होते. त्या अनुषंगाने, पुणे शहरात गांजाचा बेकायदेशीर पुरवठा करणारे इसमांवर कडक कारवाई करणेकामी, श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे व सुधीर हिरेमठ, पोलीस उप-आयुक्त, आर्थिक व सायबर, गुन्हे पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहरात रात्रीचे वेळी सुध्दा अंमली पदार्थ विरोधी पथकाकडून गस्त वाढविण्यात आली होती.

दि. ०२/०८/२०१८ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील पोलीस कर्मचारी अविनाश शिंदे, प्रफुल साबळे, मनोज साळुंके, हेमंत वाघमारे, राहुल जोशी, महेंद्र पवार, विठ्ठल खिलारे, सचिन चंदन असा पोलीस स्टाफ सरकारी वाहनाने, उत्तमनगर, वारजे- माळवाडी पोलीस स्टेशन हद्दीत अंमली पदार्थाचे अनुषंगाने बेकायदेशीर व्यापार करणा-या इसमांबाबत माहिती काढणे कामी रात्र गस्तीवर होते. त्या दरम्यान ०२.४० वा. चे सुमारास, वारजे पुणे येथील, वारजे ते उत्तमनगरकडे जाणारे रोडवर, पाटील वाईन्स या दुकानासमोर रोडवर सार्वजनिक ठिकाणी इसम नामे १) संतोष निवृत्ती ननावरे, वय- २६ वर्षे, रा.झेंडेगल्ली,कराडकर मठाचे शेजारी,पंढरपुर, ता.पंढरपुर,जि.सोलापुर, २) विशाल विलास माळी ,वय – २५ वर्षे, रा.भक्तीमार्ग, सांगोला रोड, बत्तीसं खोल्या झोपडपटटी, पंढरपुर,ता.पंढरपुर, जि.सोलापुर, ३) योगेश ऊर्फ जॉकी अशोक वाघमारे, वय – ३१ वर्षे,रा. संतपेठ,नऊ नंबर शाळेजवळ, महापुर चाळ, पंढरपुर,ता.पंढरपुर, जि. सोलापुर व ४) नितीन दिनकर साळेकर, वय – ३२ वर्षे, रा.दत्तनगर, पतंगराव कॉलेजमागे, पंढरपुर फाटा,नायगांव रोड, शिरवळ, ता खंडाळा जि.सातारा हे संशयितरित्या ची पांढ-या रंगाची टाटा व्हिस्टा कार क्रं. एम एच १३ बी एन २१३९ सह थाबंलेले आढळुन आले.

त्यांचेकडे अंमली पदार्थ असल्याचा संशय आल्याने, एनडीपीएस कायदयातील बंधनकारक तरतुदीचे पालन करुन, प्रमाणे अ.क्र. १ ते ४ यांचे ताब्यात असलेल्या पांढ-या रंगाची टाटा व्हिस्टा कार क्रं. एम एच १३ बी एन २१३९ या कारची झडती घेतली असता, नमुद कारचे मागील डिक्कीमधील बारदान पोत्यात ३० किलो ४२० ग्रॅम वजनाचा गांजा कि.रु. ४,५६,३००/- चा मिळुन आला.

सदरची कारवाई मा. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) मा. सुधीर हिरेमठ, पोलीस उप आयुक्त, आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे व मा. निलेश मोरे सहा. पोलीस आयुक्त (आर्थिक व सायबर) गुन्हे, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे प्रमुख पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व पोलीस कर्मचारी अविनाश शिंदे, प्रफुल साबळे, मनोज साळुंके, हेमंत वाघमारे, राहुल जोशी, महेंद्र पवार, विठ्ठल खिलारे, सचिन चंदन यांनी केली आहे.